पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ५५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १७/३/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २३१०**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ११/१०/२००८ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ७/२/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/८३३ दि. ५/३/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १,३९,६२,२८९/- चा तक्ता माहितीसाठी.

### हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. २३११**

आयातकर कार्यालयाकडील निर्गत रिफंड क्लेम, निर्गत रिफंड तक्ता, निर्गत नोट, निर्गत दाखला, आयातकर पावती व अन्य अनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/८३५ दि. ६/३/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ८५ सन २००८-२००९ चा विचारासाठी.

**विषय क्रं. २३१२**

आयातकर कार्यालयाकडील निर्गत रिफंड क्लेम, निर्गत रिफंड तक्ता, निर्गत नोट, निर्गत दाखला, आयातकर पावती व अन्य अनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/८३७ दि. ६/३/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ८६ सन २००८-२००९ चा विचारासाठी.

Unregistered

### सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्रं. २३१३**

नगरसचिव कार्यालयाकडील श्री.शेवाळे राजेंद्र हरिभाऊ, हुद्दा ज्येष्ठ समिती लेखनिक (वेतनश्रेणी रुपये ५१५० ते ११३५०) यांनी स्वत:चे टेबलाचे काम सांभाळून कार्यालयीन कामाच्या सोईसाठी अति.कार्यालय अधिक्षक (वेतनश्रेणी रुपये ५३०० ते ११८००) या पदाचे काम दि. १/६/२००८ ते २५/२/२००९ पर्यंत पाहिले असल्याने त्यांना उपरोक्त कालावधीचे मान्य धोरणानुसार ५% विशेष वेतन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. ६०२० दि. १२/३/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. २३१४**

नगरसचिव कार्यालयाकडील श्री.समेळ शरद एकनाथ, नगरसचिव (वेतनश्रेणी रुपये १०६५० ते२२१५०+स्पेशल पे+मोटारकार अलौन्स) यांचे रजा मुदतीत कार्यालयीन कामाच्या सोईसाठी श्री.पारखी सुनिल नारायण, उपनगरसचिव (वेतनश्रेणी रुपये ६५०० ते १४७५०) यांनी स्वत:चे टेबलाचे काम सांभाळून नगरसचिव या पदाचे काम पाहिले असल्याने दि. २०/८/२००८ ते १९/९/२००८ पर्यंत मान्य धोरणानुसार ५% विशेष वेतन व मोटारकार अलौन्स देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.उपनगरसचिव यांचे क्र. ६०२१ दि. १२/३/२००९ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. २३१५**

पं.नेहरु स्टेडियम येथील हॉटेल सारस रेस्टॉरंट, २१ निवासी खोल्या, १ कॉन्फरन्स हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स या तत्वावर दरमहा भाडे र.रुपये १,२९,४१३/– प्रथम वर्षासाठी निर्धारित करुन व त्यानंतर प्रतिवर्षी १२% भाडेवाढ प्रस्तुत करुन ५ वर्षे चालविण्यास देणेकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात जास्त रक्कमेची निविदा देणारे श्री.सतिश शेट्टी (विनय केटरर्स) यांना पाच वर्षाकरीता लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दरमहा र.रुपये २,००,०५३/– प्रथम वर्षी व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी १२% भाडेवाढ करुन देण्यास तसेच मा.मुख्य सभा मान्यता देईल त्या दिनांकापासून अगर प्रत्यक्ष ताबा दिनांकापासून त्यांचेबरोबर करार करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(सक)/१५०६ दि. २७/२/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३१६**

मा.विरेंद्र किराड व मा.अशोक येनपुरे यांचे दि. ९/१/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १८३७ दि. ६/१/२००९ चा फेरविचार करण्यात यावा. (आकाशचिन्ह व जाहिरात फलक यांच्या फी चे दरात वाढ करणेबाबत)

सदर ठरावाचा फेरविचार होईपर्यंत मा.महापालिका आयुक्त यांनी कार्यवाही करु नये तसेच सदरचा ठराव १ के खाली मा.मुख्य सभेत दाखल करु नये.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३१७**

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत विकास कामांसाठी बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे यांचेकडून सन २००५–२००६ मधील मंजूर कर्ज र.रुपये २०० कोटीपैकी उर्वरित न उचललेले कर्ज र.रुपये १०० कोटी उचलणेस तसेच रुपये १७६,४६,५०,०००/– चे कर्ज उभारण्यासाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/१४४९ दि. २४/२/२००९ चे पत्र.

१) सन २००५–०६ या वित्तीय वर्षात बँक ऑफ महाराष्ट्र बाजीराव रोड शाखा पुणे यांचेकडून मा.मुख्य सभा व मे.राज्य शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार मान्य कर्ज र.रुपये २०० कोटीपैकी उर्वरित न उचललेले कर्ज र.रुपये १०० कोटी तीन वर्ष पूर्ण झाल्याने नविन कर्ज (Fresh Term Loan) या स्वरुपात सद्यपरिस्थितीतील विद्यमान बाजारदराने बी.पी.एल.आर.दर वजा १% = ११.७५% द.सा.द.शे. या व्याजदराने तसेच भविष्यात बीपीएल आर दर वजा १% द.सा.द.शे. यानुसार येणाऱ्या बदलत्या व्याजदरानुसार उचलणेस

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत विकास कामांसाठी बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे यांच्या दि. २९ डिसेंबर २००८ च्या पत्रातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांचेकडून बीपीएलआर.दर वजा १% = ११.७५% द.सा.द.शे. (सध्याचा बीपीएलआर दर १२.७५%) व्याजदराने तसेच बदलत्या बीपीएलआर दर वजा १% द.सा.द.शे. यानुसार येणाऱ्या बदलत्या व्याजदरानुसार र.रुपये १,७६,४६,५०,०००/– चे कर्ज उभारणेस व मे.राज्य शासनाची मान्यता घेण्यास

३) सदरचे कर्ज वित्तीय आवश्यकतेनुसार उचलणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १२/३/२००९ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्रं. २३१८**

मनपा निधीमध्ये उपलब्ध होणाऱ्या र.रुपये ३० कोटीची गुंतवणूक १३ महिने मुदतीसाठी करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/१५१४ दि. ९/३/२००९ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्रं. २३१९**

मनपा निधीमध्ये उपलब्ध होणाऱ्या र.रुपये ७० कोटीची गुंतवणूक १३ महिने मुदतीसाठी करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/१५१५ दि. ९/३/२००९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered

# स्थायी समिति
## दाखल विषय – दि. १७/३/२००९

**विषय क्रं. २३२०**

मा.ॲड्.अविनाश साळवे व मा.राजेंद्र वागसकर यांचे दि. १७/३/२००९ चे फेरविचाराचे पत्र.

मा.ॲड्.अविनाश साळवे, मा.राजेंद्र वागसकर, मा.सौ.दिपाली धुमाळ व मा.अनिल जाधव यांचे दि. १७/३/२००९ चे फेरविचाराचे पत्र.

स्थायी समिति ठराव क्र. २२८५ दि. १२/३/२००९ व स्थायी समिति ठराव क्र. २२८९ दि. १२/३/२००९ चा फेरविचार करण्यात यावा. (कोथरूड स.नं.१४३/१, १४३/२, १४४/१+२ व १४३/३, १४४/३ या जमिनीवरील टी.डी.आर घोटाळ्याबाबत)

सुनिल पारखी
उपनगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

UnRegistered